लोकमत कोल्हापूर, मंगळवार, दि. ११ जून २०१९

अकरावी प्रवेशाबाबत आजपासून उद्‌बोधन वर्ग

लोकमत न्यूज नेटवर्क

कोल्हापूर : यावर्षी शहरातील विविध महाविद्यालयांतील अकरावी इयत्तेची केंद्रीय प्रवेशप्रक्रिया ऑनलाईन पद्धतीने होणार आहे. ऑनलाईन स्वरूपातील प्रक्रियेबाबत विद्यार्थी, पालकांना मार्गदर्शन करण्यासाठी आज, मंगळवारपासून उद्‌बोधन वर्ग होणार आहे. राम गणेश गडकरी हॉलमध्ये सकाळी साडेदहापासून या वर्गाचा प्रारंभ होईल.

शिक्षण उपसंचालक कार्यालय आणि केंद्रीय प्रवेशप्रक्रिया समितीच्या वतीने या उद्‌बोधन वर्गांचे आयोजन केले आहे. शहरातील ३३ महाविद्यालयांतील एकूण १४,१४० जागांसाठी प्रवेश प्रक्रिया ऑनलाईन स्वरूपात होणार आहे. या प्रक्रियेची माहिती देण्यासाठी सकाळी साडेदहा ते दुपारी साडेबारा आणि दुपारी तीन ते सायंकाळी पाच या वेळेत मंगळवारी (दि. ११) राम गणेश गडकरी हॉल आणि बुधवारी (दि. १२) विवेकानंद कॉलेजमध्ये उद्‌बोधन वर्ग होईल. कोल्हापूर विभागाचे साहाय्यक शिक्षण संचालक सुभाष चौगुले, निवृत्त साहाय्यक शिक्षण संचालक संपतराव गायकवाड, आदी मार्गदर्शन करतील. दहावी वर्गशिक्षक, मुख्याध्यापक, संकलन केंद्रावरील नियुक्त शिक्षक, अधिकारी, कर्मचाऱ्यांना मार्गदर्शन करण्यासाठी गुरुवारी (दि. १३) मेन राजाराम हायस्कूल व ज्युनिअर कॉलेजमध्ये उद्‌बोधन वर्ग होईल.

बारावीच्या गुणपत्रिका आज मिळणार

बारावीचा निकाल मे महिन्याच्या अखेरीस जाहीर झाला. त्याच्या गुणपत्रिका विद्यार्थ्यांना आज, मंगळवारी दुपारी तीन वाजता त्यांच्या महाविद्यालयांमध्ये वितरीत केल्या जाणार आहेत. गुणपत्रिकेची मूळ प्रत मिळाल्याने पदवी प्रथम वर्ष प्रवेशप्रक्रियेला गती मिळेल.

महाराष्ट्र टाइम्स । कोल्हापूर । मंगळवार, ११ जून २०१९

विवेकानंद, डांगे कॉलेज प्रथम

कोल्हापूर टाइम्स टीम

शिवाजी विद्यापीठ संलग्न महाविद्यालयीन विद्यार्थ्यांमधील लेखनकौशल्याला वाव देण्यासाठी घेण्यात आलेल्या महाविद्यालयीन नियतकालिक स्पर्धेत विवेकानंद कॉलेज व आण्णासाहेब डांगे कॉलेज यांनी सर्वसाधारण विजेतेपद पटकावले.

बिगर व्यावसायिक गटात कोल्हापुरातील विवेकानंद कॉलेजच्या विवेक या नियतकालिकास तर व्यावसायिक गटात सांगली जिल्ह्यातील वाळवा येथील अण्णासाहेब डांगे कॉलेज ऑफ इंजिनीअरिंग अँड टेक्नॉलॉजीच्या ज्ञानदा या नियतकालिकाने प्रथम क्रमांक पटकावला. बिगर व्यावसायिक गटात विटा येथील बळवंत कॉलेजच्या बळवंत या नियतकालिकाने द्वितीय तर वारणानगरच्या यशवंतराव चव्हाण महाविद्यालयाच्या वारणा या नियतकालिकाने तृतीय क्रमांक पटकावला. व्यावसायिक गटात अतिग्रे येथील संजय घोडावत इन्स्टिट्यूशनच्या उमंग या नियतकालिकाने द्वितीय तर इचलकरंजीच्या डीकेटीई संचलित वस्त्रोद्योग व अभियांत्रिकी कॉलेजच्या अंबर या नियतकालिकाने तृतीय क्रमांक मिळवला. प्र कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांच्या हस्ते फिरते चषक देऊन गौरवण्यात आले. विवेकानंद कॉलेजचे प्राचार्य डॉ. एस. वाय. होनगेकर, सुशांत पाटील, डॉ. सर्जेराव जाधव यांनी पारितोषिकाचा स्वीकार केला. कुलसचिव डॉ. व्ही. डी. नांदवडेकर यांनी प्रास्ताविक केले. अभिजित लिंग्रस यांनी सूत्रसंचालन केले.

शिवाजी विद्यापीठाच्या नियतकालिक स्पर्धेतील विजेत्या महाविद्यालय व विद्यार्थ्यांसमवेत प्र कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, कुलसचिव डॉ. व्ही. डी. नांदवडेकर, वित्त व लेखाधिकारी व्ही. टी. पाटील आदी.